# जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर
## (ग्रामपंचायत शाखा)

क्र. कावि/ग्रापं/कार्या 8अ/ 260/2017 दिनांकः-28/07/2017

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

**विषयः-** **अहमदनगर जिल्हा परिषदेतील 20 चांदेकासारे या निवडणूक विभागाच्या निवडणूकीची अधिसूचना प्रसिध्द करणेबाबत....**

**संदर्भः-** मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्र. रानिआ/जिपपस/2017 दिनांक 15/07/2017

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांनी संदर्भिय पत्रान्वये अहमदनगर जिल्हा परिषदेतील 20 चांदेकासारे या निवडणूक विभागाच्या निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला. सदर निवडणूकीची अधिसूचना आपल्या कार्यालयाच्या सूचना फलकावर व आपले कार्यालयाच्या संकेतस्थळावर दिनांक 31/07/2017 रोजी प्रसिध्द करुन आपला प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा. सोबत अधिसूचनेची प्रत जोडली आहे.

Flawatkar

**उपजिल्हाधिकारी महसूल**
**जिल्हाधिकारी अहमदनगर करिता**

अनुसूची

| निवडणूक विभागाचे नाव | नामनिर्देशनपत्र सादर करण्यासाठी शेवटची तारीख व वेळ | नामनिर्देशनपत्र छाननी करण्यासाठी तारीख व वेळ | नामनिर्देशनपत्र सादर करण्याची व त्यांची छाननी करण्याचे ठिकाण | आवश्यक असेल तर ज्या तारखेस मतदान घेण्यात येईल ती तारीख | ज्या वेळेमध्ये मतदान घेण्यात येईल ती वेळ | मतमोजणी साठी तारीख व वेळ | मतमोजणी करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 20) चांदे कासारे | सोमवार दि.31 जूलै 2017 ते शनिवार दि. 5 ऑगस्ट 2017 पर्यंत सकाळी 11 ते दुपारी 3.00 पर्यत | सोमवार दि. 7 ऑगस्ट 2017 सकाळी 11 वाजल्यापासून ते छाननी संपेपर्यंत | तहसिल कार्यालय प्रशासकीय इमारत नगरपालिके समोर कोपरगाव | रविवार दि.20 ऑगस्ट 2017 | सकाळी 7.30 ते 5.30 पर्यंत | सोमवार दि. 21 ऑगस्ट 2017 सकाळी 10.00 वाजेपासून | तहसिल कार्यालय प्रशासकीय इमारत नगरपालिके समोर कोपरगाव |

ठिकाण- अहमदनगर

दिनांक- 31/7/2017

(अभय महाजन) २५.७.१

जिल्हाधिकारी अहमदनगर

परिशिष्ट - 1

नमुना-1

(नियम 11 पहा)

**जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर**

क्र. कावि/ग्राप/कार्या8अ/ 216/2017

दिनांक 31/07/2017

महाराष्ट्र, जिल्हा परिषदा(मतदार विभाग आणि निवडणूक घेणे) नियम, 1962 मधील नियम 11, पोटनियम(1-अ) या अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन मी, अभय महाजन जिल्हाधिकारी अहमदनगर जिल्हा अहमदनगर याव्दारे यासोबत असलेल्या अनुसूचीच्या स्तंभ 1 मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या निवडणूक विभागातर्फे (ज्यांचा यात यापुढे "संबंधित निवडणूक विभाग" असा उल्लेख करण्यात आलेला आहे.) करण्यात येणा-या निवडणूकीच्या संबधात, पुढील तारीख,वेळ व जागा निश्चित करीत आहे.

(अ) उक्त अनुसूचीच्या स्तंभ 2 मध्ये, संबधित मतदार विभागासमोर निर्दिष्ट केलेल्या तारखा व वेळा हया संबधित निवडणूक विभागाच्या संबंधात नामनिर्देशन पत्रे सादर करण्यासाठी असलेल्या अखेरच्या तारखा व वेळा असतील.

(ब) उक्त अनुसूचीच्या स्तंभ 3 मध्ये संबधित निवडणूक विभागासमोर निर्दिष्ट केलेल्या तारखा व वेळा हया संबधित विभागाच्या संबंधात नामनिर्देशनपत्राची छाननी करण्यासाठी असलेल्या तारखा व वेळा असतील.

(क) उक्त अनुसूचीच्या स्तंभ 4 मध्ये, संबधित निवडणूक विभागासमोर निर्दिष्ट केलेल्या जागा हया नामनिर्देशन सादर करण्याच्या व त्यांची छाननी करण्याच्या जागा असतील.

(ड) उक्त अनुसूचीच्या स्तंभ 5 मध्ये, संबधित निवडणूक विभागासमोर निर्दिष्ट करण्यात आलेल्या तारखा हया अहमदनगर जिल्हा परिषदेच्या निवडणूका ज्या तारखास घेण्यात येतील त्या तारखा असतील.

(ई) उक्त अनुसूचीच्या स्तंभ 6 मध्ये संबधित निवडणूक विभागासमोर निर्दिष्ट केलेल्या वेळा हया ज्या वेळांमध्ये मतदान घेण्यात येईल त्या वेळा असतील.

(फ) उक्त अनुसूचीच्या स्तंभ 7 मध्ये संबधित निवडणूक विभागासमोर निर्दिष्ट केलेल्या तारखा व वेळा हया मतमोजणीसाठी असलेल्या तारखा व वेळा असतील.

(ग) उक्त अनुसूचीच्या स्तंभ 8 मध्ये, संबधित निवडणूक विभागासमोर निर्दिष्ट केलेल्या जागा हया मतमोजणीसाठी असलेल्या जागा असतील.